पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.
मा.स्थायी समिती
**कार्यपत्रिका क्रमांक – १३०**
(सभावृत्तांत)

**दिनांक – ३१/०७/२०१९** **वेळ – दुपारी ०२.३० वा.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची **साप्ताहिक** सभा बुधवार **दि.३१/०७/२०१९** रोजी दुपारी **०२.३०** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.

१. **मा.मडिगेरी विलास हनुमंतराव – सभापती**
२. मा.गावडे राजेंद्र तानाजी
३. मा.आंगोळकर सागर सुनिल
४. मा.ममता विनायक गायकवाड
५. मा.करुणा शेखर चिंचवडे
६. मा.लोंढे नम्रता योगेश
७. मा.खानोलकर प्रज्ञा महेश
८. मा.चोंधे आरती सुरेश
९. मा.संतोष (आण्णा) ज्ञानेश्वर लोंढे
१०. मा.लांडगे राजेंद्र किसनराव
११. मा.पंकज दत्तात्रय भालेकर
१२. मा.कलाटे मयूर पांडूरंग
१३. मा.कलाटे राहुल तानाजी
१४. मा.बारणे झामाबाई बाळासाहेब

या शिवाय मा.श्रावण हर्डिकर – आयुक्त, मा.पाटील – अति.आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.पाटील – प्र.शहर अभियंता, मा.पवार - उपसंचालक नगररचना, मा.तुपे, मा.निकम – सह शहर अभियंता, मा.सवणे – प्र.सह शहर अभियंता, मा.चितळे, मा.आष्टीकर, मा.दुरगुडे, मा.इंदलकर, मा.झगडे, मा.लोणकर, मा.खोत, मा.बोदडे - सहाय्यक आयुक्त, मा.दांगट – प्र.सहाय्यक आयुक्त, मा.साळुंके - मुख्य उद्यान अधिक्षक, मा.पाटील - प्राचार्य, औ.प्र.केंद्र, मा.शिंदे – प्रशासन अधिकारी (प्रथमिक शिक्षण), मा.मुंढे - प्र.शिक्षणाधिकारी (माध्यमिक शिक्षण विभाग), मा.पोमण – मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी, मा.डॉ.साळवे – अति.आरोग्य वैद्यकिय अधिकारी, मा.डॉ.वाबळे – अधिष्ठाता YCMH, मा.तांबे, मा.चव्हाण, मा.लडकत, मा.खाबडे,

मा.जुंधारे, मा.गलबले, मा.घोडे, मा.ओंभासे, मा.गट्टूवार, मा.पुजारी, मा.पाटील, मा.घुबे, मा.पवार, मा.देशमुख, मा.फुटाणे, मा.राणे, मा.वाघुंडे, मा.पोरेड्डी - कार्यकारी अभियंता, मा.डॉ.दगडे - पशुवैद्यकीय अधिकारी, मा.जगताप – कामगार कल्याण अधिकारी, मा.बहुरे – प्रशासन अधिकारी, मा.गोफणे – आरोग्य अधिकारी, मा.माने – लेखाधिकारी PMPML हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करून घेणेत आले –**

विषय क्र.१९) मंगळवार दि.०६/०८/२०१९ रोजी पिंपळे सौदागर येथे सायंकाळी ५.०० वाजता महिला बचत गटांसाठी मार्गदर्शन आयोजित करणेबाबत.- मा.आरती चोंधे, मा.राजेंद्र गावडे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.२०) प्र.क्र.२६ वाकड – पिंपळे निलख मधील अंतर्गत रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करणेबाबत.

विषय क्र.२१) लोकशाहीर आण्णाभाऊ साठे प्रबोधन पर्व सन २०१९ चे कार्यक्रमाकरीता येणा-या खर्चास मान्यता देणेबाबत.

विषय क्र.२२) जाहिरात रोटेशन धोरण सन २०१९-२० बाबत.

विषय क्र.२३) पिंपरी येथील रेल्वे वरील इंदिरा गांधी उड्डाणपुलाचे स्ट्रक्चरल ऑडीट करणे व दुरूस्तीकरणे या कामासाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लगार यांची नेमणूक करणेबाबत.

विषय क्र.२४) शहर झोपडपट्टी पुनर्वसन अंतर्गत अजंठानगर, विठ्ठलनगर येथील प्रकल्पामधील इमारतीची लिफ्ट खरेदी करणे व (AMC) करणेबाबत.

विषय क्र.२५) सन २०१९-२० चे अंदाजपत्रकीय तरतुदीमध्ये फेरबदल करून तरतूद वर्ग करणेकामी व तरतूदीमध्ये वाढ/घट करणेबाबत.(वाढ/घट र.रू.४३,५०,०००/-)

विषय क्र.२६) सन २०१९-२० चे अंदाजपत्रकीय तरतुदीमध्ये फेरबदल करून तरतूद वर्ग करणेकामी व तरतूदीमध्ये वाढ/घट करणेबाबत.(वाढ/घट र.रू.१०,००,०००/-)

----------

(मा.मेधा प्रविण साळुंके – उच्चस्तर लघुलेखक ह्या दि.३१/७/२०१९ रोजी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त होत असल्याने मा.स्थायी समितीच्या वतीने मा.सभापती, स्थायी समिती आणि मा.आयुक्त यांचे हस्ते शाल, श्रीफळ, गुलाब पुष्प व पुस्तक देऊन सत्कार करण्यात आला.)

----------

दिनांक २४/०७/२०१९ रोजी झालेल्या सभेचा **(कार्यपत्रिका क्र.१२९)** चा सभावृत्तांत कायम करणेत आलेचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

ठराव क्रमांक - ५१०६ | विषय क्रमांक – १

दिनांक – ३१/०७/२०१९ | विभाग – स्थापत्य ह मुख्यालय

सूचक – मा.राजेंद्र लांडगे | अनुमोदक – मा.संतोष लोंढे

संदर्भ – मा.अति. आयुक्त यांचे कडील पत्र क्र.स्था/नि/क-मुख्य/२५०/१९ दि.१६/०७/२०१९

मा.अति. आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र. 88/3/2018-19 अन्वये कासारवाडी जलतरण तलावास संरक्षण भिंत बांधणे व रस्ता विकसित करणेकामी मे.यशकिर्ती डेव्हलपर अँड कॉन्ट्रॅक्टर नि.र.रू.74,62,391/- (अक्षरी र.रु.चौ-याहत्तर लाख बासष्ठ हजार तीनशे एक्यान्नव फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.73,70,871/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.73,70,871/- पेक्षा 21.99% कमी म्हणजेच र.रु.57,50,016/- + रॉयल्टी चार्जेस र.रु.30,910/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.60,610/- = एकुण र.रु.58,41,536/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक - ५१०७ | विषय क्रमांक – २

दिनांक – ३१/०७/२०१९ | विभाग – लेखा विभाग

सूचक – मा.राजेंद्र गावडे | अनुमोदक – मा.सागर आंगोळकर

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे कडील पत्र क्र.लेखा/३/कावि/१७७/१९ दि.१७/०७/२०१९

विषय – पीएमपीएमएल संस्थेस संचलनतूट व विविध प्रकारचे पासेसपोटी दरमहा रक्कम अदा करणेबाबत.

विषय क्र.२ चा विचार पुढील सभेच्या वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक - ५१०८ विषय क्रमांक – ३
दिनांक – ३१/०७/२०१९ विभाग – नगररचना व विकास
सूचक – मा.राजेंद्र लांडगे अनुमोदक – मा.नम्रता लोंढे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे कडील पत्र क्र.नरवि/कावि/०८/२०८/१९ दि.१७/०७/२०१९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

महाराष्ट्र औदयोगिक विकास महामंडळाच्या रावेत जलशुध्दीकरण केंद्रांचे जागेतुन पर्यायी रस्त्याकरीता पिंपरी चिंचवड महानगरपालिकेस हस्तांतर करावयाच्या जागेचे क्षेत्र ४९२६ चौ.मी. साठी मुल्यांकन र.रू.६,५६,६३,६००/- (अक्षरी र.रू.सहा कोटी छपन्न लाख त्रेसष्ठ हजार सहाशे फक्त) उप मुख्य लेखाधिकारी, पुणे (Dy. CAO, MIDC, Pune) यांना अदा करणेस व नगररचना व विकास विभाग यांचेकडे “भूसंपादन निधी” लेखाशिर्षातुन सदरची रक्कम अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक - ५१०९ विषय क्रमांक – ४
दिनांक – ३१/०७/२०१९ विभाग – स्थापत्य अ मुख्यालय
सूचक – मा.राजेंद्र गावडे अनुमोदक – मा.करूणा चिंचवडे
संदर्भ – मा.अति. आयुक्त यांचे कडील पत्र क्र.स्था/नि/अ-मुख्य/२४७/१९ दि.०३/०७/२०१९

मा.अति. आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.81/3/2018-19 अन्वये प्रभाग क्र.९ शाहुनगर येथे बहिरवाडे मैदाना भोवती सीमाभिंत बांधणे व इतर अनुषंगिक कामे करणेकामी मे.पाटिल अँन्ड असोशिएट नि.र.रू.75,18,276/- (अक्षरी र.रु.पंच्याहत्तर लाख अठरा हजार दोनशे शहात्तर फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.73,75,691/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.73,75,691/- पेक्षा 25.09% कमी म्हणजेच र.रु.55,25,130/- + रॉयल्टी चार्जेस र.रु.79,335/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.63,250/- = एकुण र.रु.56,67,715/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक - ५११० विषय क्रमांक – ५

दिनांक – ३१/०७/२०१९ विभाग – ह क्षेत्रीय

सूचक – मा.राजेंद्र गावडे अनुमोदक – मा.आरती चोंधे

संदर्भ – मा.क्षेत्रीय अधिकारी यांचे कडील पत्र क्र.हक्षे/३/कावि/४६८/२०१९ दि.१८/०७/२०१९

मा.क्षेत्रीय अधिकारी यांची शिफारस विचारात घेवून –

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या ह क्षेत्रीय कार्यालयातील नागरिकांना डेंगू, मलेरिया, चिकुनगुण्या या आजाराची लागण होऊ नये म्हणून प्रतीबंधनात्मक उपाय म्हणून औष्णिक धुरीकरण करणेकामी डिझेलवर चालणारे तीन चाकी चार रिक्षा टॅम्पो भाड्याने घेणेकामी निविदा नोटीस क्र.१/२०१७-१८ नुसार प्रसिद्ध करणेत येऊन निविदा दर मागविण्यात आले होते. या निविदा उघडण्याबाबत मा.क्षेत्रीय अधिकारी यांनी दि.४/०४/२०१८ रोजी मान्यता दिल्याने त्या उघडण्यात येऊन त्यामध्ये मे.श्री संत गाडगेबाबा महाराज बेरोजगार संस्था यांनी प्रति दिन टॅम्पो र.रू.७०४.२७ हा लघुत्तम दर प्राप्त झाल्याने सदरचा दर मान्य करण्यात आलेला आहे. त्यानुसार वाहतुक ठेकेदाराकडुन विहीत नमुन्यातील दि.६/०४/२०१८ रोजी सिलबंद करारनामा घेऊन आदेश क्र.हक्षे/१/कावि/१०१/२०१८ दि.२३/४/२०१८ अन्वये (२३/०४/२०१८ ते २२/०४/२०१९) अथवा पुढील निविदा प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत कामाचे आदेश देणेत आलेले आहेत. सदर कामास व दरास मा.स्थायी समिती ठराव क्र.२६६४ दि.१६/०५/२०१८ अन्वये मान्यता देणेत आलेली आहे परंतु सध्यस्थितीत म.न.पा. मार्फत नवीन (NIC) निविदा प्रणाली कार्यान्वित करणेची प्रक्रिया असल्याने सदर निविदा (NIC) निविदा प्रणालीत प्रसिद्ध कारणेकामी काही कालावधी लागणार असल्याने पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या ह क्षेत्रीय कार्यालयातील नागरिकांना डेंगू, मलेरिया, चिकुनगुण्या या आजाराची लागण होऊ नये म्हणून प्रतीबंधनात्मक उपाय म्हणून औष्णिक धुरीकरणकरणे या कामाचा ठेका मिळालेले ठेकेदार मे.श्री संत गाडगेबाबा महाराज बेरोजगार संस्था यांना दि.२३/०४/२०१९ पासून ०४ महिने किवा निविदा नोटीस कार्यवाही पुर्ण होवून आदेश होईपर्यंत कालावधी साठी या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेबाबत मा.क्षेत्रीय अधिकारी यांची मागणी असली तरी प्रस्तुत कामासाठी र.रू.२,९२,९७६/-(अक्षरी र.रू.दोन लाख ब्याण्णव हजार नऊशे शहात्तर फक्त) इतक्या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक - ५१११ विषय क्रमांक – ६

दिनांक – ३१/०७/२०१९ विभाग – स्थापत्य क मुख्यालय

सूचक – मा.सागर आंगोळकर अनुमोदक – मा.झामाबाई बारणे

संदर्भ – मा.अति.आयुक्त यांचे कडील पत्र क्र.स्था/नि/क-मुख्य/२५५/२०१९ दि.२०/०७/२०१९

मा.अति.आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.99-7-2018-19 अन्वये प्रभाग क्र.६ धावडेवस्ती मधील भैरवनाथ शाळेशेजारील नाल्यावर सी डी वर्क बांधणेकामी मे.एस.बी.काळे नि.र.रू.64,42,738/-

(अक्षरी र.रू.चौसष्ठ लाख बेचाळीस हजार सातशे अडोतीस फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.63,57,570/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.63,57,570/- पेक्षा 18.75% कमी म्हणजेच र.रु.51,65,526/- + रॉयल्टी चार्जेस र.रु.28,268/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.56,900/- = एकुण र.रु.52,50,694/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक - ५११२ | विषय क्रमांक – ७
दिनांक – ३१/०७/२०१९ | विभाग – इ क्षेत्रीय, स्थापत्य
सूचक – मा.राजेंद्र लोंढे | अनुमोदक – मा.राजेंद्र गावडे

संदर्भ – मा.अति.आयुक्त यांचे कडील पत्र क्र.इक्षे/स्था/कावि/५६३/२०१९ दि.२०/०७/२०१९

मा.अति.आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

प्रभाग क्र.७ येथील नैसर्गिक नाला लांडेवाडी, आदिनाथनगर, रामनगर या परिसरातुन वाहतो सदर परिसरामध्ये पावसाळयामध्ये नागरिकांच्या घरात पाणी साठत असल्याने पावसाळी पाणी वाहुन जाणे करिता Strom Water Line टाकणे आवश्यक आहे. प्रस्तुत कामास सन २०१९-२० च्या अंदाजपत्रकातील पान क्र.१७६ अनु क्र.३ नुसार र.रू.१०००/- ऐवढी तरतुद आहे. तरी प्रस्तावात नमूद प्रमाणे कामांचे तरतुदी मध्ये वाढ घट करणेस मान्यता देणेत येत आहे. (वाढ/घट र.रू.२५,००,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक - ५११३ | विषय क्रमांक – ८
दिनांक – ३१/०७/२०१९ | विभाग – उद्यान
सूचक – मा.संतोष लोंढे | अनुमोदक – मा.नम्रता लोंढे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे कडील पत्र क्र.उद्यान/६/कावि/६६९/२०१९ दि.१८/०७/२०१९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे निसर्गकवी बहिणाबाई चौधरी प्राणिसंग्रहालय या ठिकाणी १.पशुवैदयक या पदाकरिता श्रीमती.डॉ.चैत्राली अशोक आव्हाड यांची दरमहा र.रु.४५,०००/- व २.प्राणीजीव शास्त्रज्ञ तथा शैक्षणिक अधिकारी (बायोलॉजिस्ट) या पदावर श्रीमती.अंजली प्रतापसिंह बोराडे यांची दरमहा र.रु.३०,०००/- प्रस्ताव नमूद केलेप्रमाणे पुढील ६ महिने कालावधीकरिता नियुक्ती तथा मानधन खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक - ५११४ विषय क्रमांक – ९

दिनांक – ३१/०७/२०१९ विभाग – अ क्षेत्रीय, स्थापत्य

सूचक – मा.सागर आंगोळकर अनुमोदक – मा.झामाबाई बारणे

संदर्भ – मा.अतिरिक्त आयुक्त यांचे कडील पत्र क्र.अक्षे/स्था/कावि/५/१३९/१९ दि.१८/०७/२०१९

मा.अतिरिक्त आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

स्वच्छ सर्वेक्षण २०२० मध्ये शहर ओडीएफ+ व ओडीएफ ++ होणेसाठी २५० गुणांक असणार आहेत. त्यासाठी २०२० च्या सर्वेक्षण पुर्वी सार्वजनिक व सामुदायिक शौचालय दुरुस्ती होणेसाठी गुगल मॅपिंग केलेल्या सार्वजनिक व सामुदायिक शौचालयांचे स्ट्रक्चरल ऑडीट करणेचे मा.शहर अभियान संचालक यांचे सुचनेनुसार महानगरपालिकेच्या मालकीचे एकुण ४३६ शौचालयांचे संरक्षणात्मक परिक्षकामार्फत परिक्षण करणेकामी मे. के.बी.पी. सिव्हिल इंजिनिअरींग सर्व्हिसेस यांची नेमणुक करणेस व प्रस्तावात नमूद प्रमाणे फी अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक - ५११५ विषय क्रमांक – १०

दिनांक – ३१/०७/२०१९ विभाग – आरोग्य

सूचक – मा.सागर आंगोळकर अनुमोदक – मा.आरती चोंधे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे कडील पत्र क्र.अमुका/४/कावि/४२८/१९ दि.२०/०७/२०१९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

आरोग्य मुख्य कार्यालयाकडील सन २०१९-२० चे अंदाजपत्रकामध्ये ‘आरोग्य विषयक कन्सल्टन्सी सर्व्हीसेस’ या लेखाशिर्षावर र.रु.५७,५००/- इतकी तरतूद वर्ग करणेत आली असून रस्ते व गटर्स साफसफाई कामासाठी खाजगीकरणाव्दारे/ ठेकेदारामार्फत नियुक्त कामगारांची सन २०११ ते २०१५ या कालावधीतील पी.एफ.ची रक्कम संबंधित कामगारांच्या पी.एफ. खात्यावर जमा करणेकामी मे.त्रिमुर्ती कन्सल्टन्सी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. सदर कामाचे त्यांचे मानधन अदायगीकामी अंदाजे र.रु.३,५०,०००/- अदा करावयाचे आहे. त्यामुळे आरोग्य विषयक कन्सल्टन्सी सर्व्हीसेस” या लेखाशिर्षावर करणेत आलेली तरतूद र.रु.५७,५००/- कमी पडणार आहे. तसेच स्थानांतर केंद्र वजन काटा दुरुस्ती या लेखाशिर्षावर र.रु.६,०००/- तरतूद करणेत आली असून कचरा स्थानांतर केंद्र येथील वजन काट्यावर वजन केले जाते. कच-याची बाब अत्यावश्यक असल्यामुळे र.रु.६,०००/- ची तरतूद अपुरी पडणार आहे. सबब, आरोग्य मुख्य कार्यालयाकडील ‘आरोग्य विभागाकरीता विविध साहित्य खरेदी’ या लेखाशिर्षावर र.रु.२,००,००,०००/- तरतूद करणेत आली असून त्यामधून १) आरोग्य विषयक कन्सल्टन्सी सर्व्हीसेस या लेखाशिर्षावर र.रु.२,९२,५००/- २) स्थानांतर केंद्र वजन काटा दुरुस्ती या लेखाशिर्षावर र.रु.१,९४,०००/- वर्गीकरणाद्वारे उपलब्ध करणेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ७३ (क) नुसार मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक - ५११६ विषय क्रमांक – ११
दिनांक – ३१/०७/२०१९ विभाग – अ क्षेत्रीय, विद्युत
सूचक – मा.राजेंद्र गावडे अनुमोदक – मा.करूणा चिंचवडे
संदर्भ – मा.अतिरिक्त आयुक्त यांचे कडील पत्र क्र.४२५/२०१९ दि.१६/०७/२०१९

मा.अतिरिक्त आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिका व पुणे महानगर परिवहन लि. यांच्या संयुक्त विद्यामानाने इलेक्ट्रिक बस चार्जिंग करणे करिता उच्च दाब विज पुरवठा व अन्य विद्युत विषयक तातडीने कामे करणे आवश्यक आहे. सदर काम मनपाचे सन २०१९-२० चे अंदाजपत्रकात समाविष्ठ केलेले आहे. सदरचे काम हे वैशिष्ठ्यपुर्ण असल्याने ते गुणवत्तापुर्वक मुदतीत पुर्ण करणे गरजेचे आहे त्याकरिता तज्ञ सल्लगारांची आवश्यकता आहे. सदर कामाचे योग्य नियोजन करून पुर्वगणन अंदाजपत्रक सादर करणे दरसूची मध्ये समाविष्ठ नसलेल्या बाबींचे दरपृथकरण (RA) तयार करणे, नकाशे तयार करणे निविदा प्रक्रियेसाठी कागदपत्रांची पुर्तता करणे इ. निविदा पुर्व (Pre Tender Activity) व कामाचे आदेश मिळाल्यानंतर संपुर्ण कामाचे नियोजन व वेळोवेळी देखरेख करणे, मोजमापे तपासणे इ.निविदा पश्चात (Post Tender Activity) कामे करावी लागणार आहेत त्याकरिता विभागाकडे आवश्यक तांत्रिक मनुष्यबळी कमी असून तातडीने व गुणवत्तापुर्व काम होणेसाठी सल्लगार एजन्सी नेमणूक करणे आवश्यक आहे. अशा कामाकरिता ठरविणेत आलेला Type A मधील कॅटॅगरी IV चे हे काम आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे विद्युत विषयक कामाकरिता सल्लागार नेमणूकीसाठी नामिका सूची तयार केलेली असून त्यानुसार सल्लगारांना द्यावयाची फी शुल्कास मा.स्थायी समिती सभेचा ठराव क्र.४३२१ दि.०५/०२/२०१९ नुसार मान्यता मिळालेली आहे. प्रस्तुत कामाकरिता मनपाचे नामिका सूचीतील एजन्सीकडून कोटेशन नोटीस क्र.AZ/ELE/05/11/2/5/ 2019-20 Date 13/06/2019 प्रमाणे दर मागविले असता मे.वैष्णवी इलेक्ट्रीकल कन्सल्टंसी, पिंपरी, पुणे ४११०१८ यांचे ०.६९% हे दर सर्वात कमी प्राप्त झाले आहेत. तरी सदर कामाकरिता मे.वैष्णवी इलेक्ट्रीकल कन्सल्टंसी, पिंपरी, पुणे ४११०१८ यांची नेमणूक करणेस व ०.६९% दराने फी अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक - ५११७ विषय क्रमांक – १२
दिनांक – ३१/०७/२०१९ विभाग – ह क्षेत्रीय, आरोग्य
सूचक – मा.राजेंद्र गावडे अनुमोदक – मा.आरती चोंधे
संदर्भ – मा.क्षेत्रीय अधिकारी यांचे कडील पत्र क्र.हक्षे/आ-३/कावि/४८२/२०१९ दि.२४/०७/२०१९

मा.क्षेत्रीय अधिकारी यांची शिफारस विचारात घेवून –

ह क्षेत्रीय कार्यालयाचे कार्यक्षेत्रातील औष्णीक धुरीकरणासाठी तीन चाकी चार रिक्षा टेम्पो(डिझेल) इंधनावर चालणारी वाहने वाहन चालका सहीत भाडयाने घेणेकामी ई निविदा क्र.१/२०१९-२० करीता पात्र ठरविण्यात आलेल्या निविदा पैकी मे.जयराम कन्सट्रक्शन यांनी सुधारीत -(८.७०%) कमी

दराने काम करण्यास मान्यता दर्शविली आहे. या ठेकेदाराची निविदा, निविदा र.रु.८,३६,१६०/- पेक्षा -(८.७०%) या सर्वात कमी दराची असल्याने ती स्विकारणेत आलेली आहे. त्या अनुषांगाने मे.जयराम कन्सट्रक्शन यांचे कडून निविदा मंजूर र.रु.७,६३,४१४/- (अक्षरी र.रू.सात लाख त्रेसष्ठ हजार चारशे चौदा फक्त) पर्यंत कामाचे आदेशा पासून एक वर्ष कालवधी करीता काम करुन घेणेस तसेच पुढील निविदा प्रक्रिया पुर्ण होईपर्यंतचे प्रत्यक्ष कामकाजा करीता येणारे खर्चास मान्यता देणेबाबत मा.क्षेत्रीय अधिकारी यांची मागणी असली तरी प्रस्तुत कामाकरिता र.रू.७,६३,४१४/- (अक्षरी र.रू.सात लाख त्रेसष्ठ हजार चारशे चौदा फक्त) इतक्या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक - ५११८ विषय क्रमांक – १३
दिनांक – ३१/०७/२०१९ विभाग – स्थापत्य इ मुख्यालय
सूचक – मा.संतोष लोंढे अनुमोदक – मा.नम्रता लोंढे

संदर्भ – मा.अति.आयुक्त यांचे कडील पत्र क्र.स्था/नि/इ-मुख्य/१४२/२०१९ दि.२५/०७/२०१९

मा.अति.आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.90-1-2018-19 अन्वये प्रभाग क्र.४ रामनगर बोपखेल येथील नाला पाईपलाईन टाकून बंदीस्त करणेकामी मे.श्रीसदगुरुकृपा कन्स्ट्रक्शन नि.र.रू.1,65,89,531/- (अक्षरी र.रू.एक कोटी पासष्ठ लाख एकोणनव्वद हजार पाचशे एकतीस फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.1,63,92,064/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.1,63,92,064/- पेक्षा 19.10% कमी म्हणजेच र.रु.1,32,61,180/- + रॉयल्टी चार्जेस र.रु.1,54,767/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.42,700/- = एकुण र.रु.1,34,58,647/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक - ५११९ विषय क्रमांक – १४
दिनांक – ३१/०७/२०१९ विभाग – ह क्षेत्रीय
सूचक – मा.सागर आंगोळकर अनुमोदक – मा.झामाबाई बारणे

संदर्भ – मा.कार्यकारी अभियंता(स्थापत्य) यांचे कडील पत्र क्र.हक्षेका/लेखा/कावि/२०/२०१९ दि.२३/०७/२०१९

मा.कार्यकारी अभियंता(स्थापत्य) यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ह क्षेत्रीय कार्यालयाकडील स्थापत्य विभागाचे निविदा

कामाच्या सोबतचे प्रपत्र अ मधील (१ ते ४) नियमानुसार व निविदा अटी शर्ती प्रमाणे लघुत्तम दराच्या निविदा स्विकारणेत आलेल्या असुन मंजुर दराने ठेकेदारास निविदा करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक - ५१२० विषय क्रमांक – १५

दिनांक – ३१/०७/२०१९ विभाग – माहिती व तंत्रज्ञान

सूचक – मा.राजेंद्र गावडे अनुमोदक – मा.करूणा चिंचवडे

संदर्भ – मा.मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी यांचे कडील पत्र क्र.मातंवि/११/कावि/१०७/२०१९ दि.२६/०७/२०१९

मा.मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाचे संकेतस्थळावर रस्ते खोदाई परवानगीची प्रक्रिया संगणकीय प्रणाली व्यवस्थापन करणेकामी निविदा सूचना क्रमांक १७/२०१८-१९ नुसार लघुत्तम निविदाधारक मे.टेक नाईन सर्विसेस यांना रस्ते खोदाई प्रक्रीये मध्ये सुलभता येणेसाठी सदर संपुर्ण प्रक्रिये करीता मनपाचे संकेतस्थळावर ऑनलाईन संगणक प्रणाली व मोबाईल ऍप विकसित करणेचे कामकाज अंदाजपत्रकीय दरांपेक्षा -४.१०% ने कमी दराचे र.रू.२२,६३,२४०/- (अक्षरी र.रू.बावीस लाख त्रेसष्ठ हजार दोनशे चाळीस फक्त) देणेकामी त्यांचे सोबत केलेल्या कामाचा करारनामा करून कामकाजाचे आदेश क्र.मातवि/११/कावि/१०१/२०१९ दि.२४ जुलै २०१९ अन्वये निर्गत करण्यात करण्यात आलेले असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक - ५१२१ विषय क्रमांक – १६

दिनांक – ३१/०७/२०१९ विभाग – अ क्षेत्रीय, आरोग्य

सूचक – मा.सागर आंगोळकर अनुमोदक – मा.आरती चोंधे

संदर्भ – मा.क्षेत्रीय अधिकारी यांचे कडील पत्र क्र.अक्षेका/आ-२/कावि/४११/२०१९ दि.२४/०७/१९

मा.क्षेत्रीय अधिकारी यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिका अ क्षेत्रीय कार्यालय, आरोग्य विभागामार्फत डास प्रतिबंधक उपाययोजना अंतर्गत औष्णीक धुरिकरण कामकाज करणेत येते. याकामी तीन चाकी पिकअप व्हॅन/ रिक्षा टेम्पो आवश्यक असलेने १ वर्ष कालावधीसाठी ३ पिक अप व्हॅन/रिक्षा टेम्पो भाडेतत्वावर पुरविणे कामासाठी ई निविदा प्रणालीव्दारे दि.२९/१२/२०१८ ते ०७/०१/२०१९ या कालावधीत निविदा मागविण्यात आल्या होत्या. सदरचे कामासाठी एकूण ३ निविदा प्राप्त झाल्या असून त्यासाठी प्रस्तावात नमूद प्रमाणे प्राप्त दरपत्रकामध्ये मे.रामचंद्र एटरप्रायजेस यांनी सादर केलेला अंदाजपत्रकीय र.रू.६,६४,५६०/- (अक्षरी र.रू. सहा लाख चौसष्ठ हजार पाचशे साठ फक्त) च्या १६.१७% (र.रू.५,५७,१००=६५) कमी हा सर्वात लघूत्तम दर प्राप्त झाला आहे. सदरचे दर स्विकृत करणेत आले आहेत. याकामी त्यांचेशी करारनामा करुन दिनांक १/७/२०१९ पासून १ वर्ष कालावधीसाठी ३ पिक अप व्हॅन/रिक्षा टेम्पो भाडे तत्वावर पुरविणेकामी कामाचे

आदेश देण्यात आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक - ५१२२ विषय क्रमांक – १७

दिनांक – ३१/०७/२०१९ विभाग – नागरी सुविधा केंद्र

सूचक – मा.राजेंद्र गावडे अनुमोदक – मा.सागर आंगोळकर

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे कडील पत्र क्र.नासुके/२/कावि/१२४/२०१९ दि.२४/०७/१९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

चौथ्या टप्प्यात महापालिका कार्यक्षेत्रामध्ये एकूण ४९ ठिकाणांसाठी नागरी सुविधा केंद्र सुरु करण्यासाठी, नागरी सुविधा केंद्रचालक नियुक्त करण्याकरीता अंतिम पात्र झालेल्या एकूण ०६ अर्जदारांना महानगरपालिका निश्चित करील त्या इतर अटी/शर्तीनुसार प्रती सेवा र.रु.२०/- नागरिकांकडून स्विकारण्यात येऊन त्यापैकी र.रु.५/- महापालिकेस प्राप्त होणार आहेत. तसेच मिळकत कर, पाणीपट्टी इत्यादी बिलासाठी स्विकृत होणारे भरणा प्रती पावती र.रु.५/- याप्रमाणे महापालिकेमार्फत अदा करणेस प्रथम तीन वर्ष कालावधीसाठी करारनामा करुन खाजगी तत्वावर खालील नमूद प्रमाणे नागरी सुविधा केंद्रचालक नियुक्ती करणेस मान्यता देणेत येत आहे.

**नागरी सुविधा केंद्र (चौथा व अंतिम टप्पा) स्थळ पाहणी अहवालानुसार पात्र अर्जदारांची यादी**

| अ क्र | नविन प्रभाग क्रमांक | नव्याने आवश्यकता | प्राप्त अर्ज | अर्जदारांची नावे | शेरा | शिल्लक जागा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ३ | २ | १ | मंगेश हिरामण ताम्हाणे | पात्र | १ |
| २ | ४ | १ | १ | सुवर्णा दत्तात्रय वाळके | पात्र | ० |
| ३ | १० | २ | २ | प्रेमा राहूल पाठासकर | पात्र | ० |
| ४ | | | | सचिन बाबुराव इंगवले | पात्र | |
| ५ | १२ | २ | १ | गौरव भिवाजी थोरात | पात्र | १ |
| ६ | १८ | १ | १ | स्वप्निल ज्ञानेश्वर शेडगे | पात्र | ० |

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक - ५१२३ विषय क्रमांक – १८

दिनांक – ३१/०७/२०१९ विभाग – माध्यमिक शिक्षण

सूचक – मा.संतोष लोंढे अनुमोदक – मा.राजेंद्र लांडगे

संदर्भ – मा.अति. आयुक्त यांचे कडील पत्र क्र.माध्य/शि/३/कावि/२९३/२०१९ दि.२६/०७/१९

मा.अति. आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

सन २०१९-२० मध्ये माध्यमिक विभागाकडील “विद्यार्थी सत्कार सभारंभ” या लेखाशिर्षावर र.रू.७०,००,०००/- तरतुद आहे. सदर तरतुदीमधुन अद्याप पर्यंत काहीही रक्कम खर्च पडलेली नाही. परंतु प्रस्तावात नमूद प्रमाणे सदर कार्यक्रमासाठी अंदाजे खर्च र.रू.३०,७५,०००/- खर्च अपेक्षित आहे. त्यामुळे

सदर शालांत परीक्षा मार्च २०१९ मध्ये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील माध्यामिक शाळेततील ८०% पेक्षा जास्त गुण मिळविणा-या व ३५% पेक्षा जास्त गुण मिळविणा-या अंध व अपंग गुणवंत विद्यार्थांना यांना द्यावयाचे बक्षीस र.रू.३०,७५,०००/- (अक्षरी र.रू.तीस लाख पंच्याहत्तर हजार फक्त) किंवा प्रत्यक्ष येणा-या खर्चास मान्यता घेणे आवश्यक आहे. सदर विद्यार्थांना अदा करावयाची रक्कम ही धनादेशाद्वारे अदा न करता विद्यार्थीच्या बॅक खात्यामध्ये ECS द्वारे जमा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

**सभा कामकाजात दाखल करून घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक - ५१२४ विषय क्रमांक – १९

दिनांक – ३१/०७/२०१९

सूचक – मा.आरती चोंधे अनुमोदक – मा.राजेंद्र गावडे

संदर्भ – मा.आरती चोंधे, मा.राजेंद्र गावडे यांचा प्रस्ताव –

मंगळवार दि.०६/०८/२०१९ रोजी पिंपळे सौदागर येथे सायंकाळी ५.०० वाजता महिला बचत गटांसाठी मार्गदर्शन कार्यक्रम आयोजित करणेस व या कार्यक्रमासाठी आवश्यक ती प्रसिद्दी देणेचे काम जनता संपर्क विभागाने करणेस तसेच या कार्यक्रमासाठी आवश्यक असणारी तरतूद नागरवस्ती विकास योजना विभागाने उपलब्ध करून देणेस व सदरचे कार्यक्रमाचे आयोजन करण्यास व त्याकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक - ५१२५ विषय क्रमांक – २०

दिनांक – ३१/०७/२०१९ विभाग – स्थापत्य ड मुख्यालय

सूचक – मा.सागर आंगोळकर अनुमोदक – मा.आरती चोंधे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे कडील पत्र क्र.स्था/नि/ड-मुख्य/२३८/२०१९ दि.२९/०७/१९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.85-02-2018-19 अन्वये प्र.क्र.२६ वाकड-पिंपळे निलख मधील अंतर्गत रस्त्याचे काँक्रीटीकरण करणेकामी मे.व्ही एम मातेरे इन्फ्रास्ट्रक्चर (इं) प्रा.लि. नि.र.रू.16,64,90,190/- (अक्षरी र.रु.सोळा कोटी चौसष्ट लाख नव्वद हजार एकशे नव्वद फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.16,55,21,256/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.16,55,21,256/- पेक्षा 6.4% कमी दराने निविदा प्राप्त झालेली आहे. सन 2018-19 चे एस.एस.आर. दरानुसार प्राप्त निविदा स्विकृत योग्य दरापेक्षा 11.35% ने कमी येत असल्याने प्राप्त निविदा मंजूर दराने म्हणजेच

र.रु.15,49,27,896/- + रॉयल्टी चार्जेस र.रु.8,27,534/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.1,41,400/- = एकुण र.रु.15,58,96,830/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक - ५१२६ विषय क्रमांक – २१

दिनांक – ३१/०७/२०१९ विभाग – माहिती व जनसंपर्क

सूचक – मा.राजेंद्र गावडे अनुमोदक – मा.संतोष लोंढे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे कडील पत्र क्र.माजसं/४/कावि/४०३/२०१९ दि.२६/०७/१९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्यावतीने निगडी येथे साहित्यरत्न लोक शाहिर अण्णाभाऊ साठे प्रबोधन पर्व दि.०१/०८/२०१९ ते ०५/०८/२०१९ या कालावधीत आयोजित करणेत आले आहे. या अतंर्गत आयोजित कार्यक्रमामधील व्याख्याते व कलाकारांचे मानधन, बक्षिसे, फ्लेक्स बॅनर, स्मृतीचिन्हे, चहापान नाष्टा व भोजन व्यवस्था इ. करीता थेट पद्धतीने अंदाजे र.रु.२२,३०,०००/- (अक्षरी र.रु.बाव्वीस लाख तीस हजार फक्त) इतका खर्च अथवा येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक - ५१२७ विषय क्रमांक – २२

दिनांक – ३१/०७/२०१९ विभाग – माहिती व जनसंपर्क

सूचक – मा.राजेंद्र गावडे अनुमोदक – मा.संतोष लोंढे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे कडील पत्र क्र.माजसं/२/कावि/३१९/२०१९ दि.२६/०७/१९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने शासनमान्य यादीवर असणा-या वृत्तपत्रांना शासनमान्य दराने जाहिराती देणेत येतात. यामध्ये अ, ब, व क वर्ग वृत्तपत्रांचा समावेश आहे. शासनमान्य दराने जाहिरात प्रसिध्द करणा-या प्रस्तावात नमूद प्रपत्र अ नुसार वृत्तपत्रांना मनपाच्या यादीवर घेण्यास व शासनमान्य दराने जाहिराती वितरीत करण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक - ५१२८ विषय क्रमांक – २३

दिनांक – ३१/०७/२०१९ विभाग – स्थापत्य BRTS

सूचक – मा.राजेंद्र गावडे अनुमोदक – मा.करूणा चिंचवडे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे कडील पत्र क्र.स्था/BRTS/६८३/२०१९ दि.३१/०७/२०१९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी येथील रेल्वेवरील इंदिरा गांधी उड्डाणपूल सुमारे ३५ वर्षापूर्वी रेल्वे मार्फत बांधलेला असून सदर पुलास चार बाजूने पोहच रस्ते आहेत. सदर पुलाची सद्यस्थितीत पडझड व दुरावस्था लक्षात घेता पुलाचे लवकरात लवकर स्ट्रक्चरल ऑडीट करुन देखभाल दुरुस्ती करणे आवश्यक होते. त्याअनुषंगाने मे.सी.व्ही.कांड कन्स्लटंट प्रा.लि. यांची स्ट्रक्चरल ऑडीट करणेकामी नेमणूक करणेत आली होती. मे.सी.व्ही.कांड कन्सल्टंट प्रा.लि. यांनी त्यांचे कडील पत्र दि.CV/KCPL/PCMC/Indira/Audit/463 दि.३०/०५/२०१८ अन्वये स्ट्रक्चरल ऑडीटचा रिपोर्ट (Condition Survey Report) सादर केला आहे. त्या अनुषंगाने सदर पुलाची दुरुस्तीची कामे करणेसाठी विषयांकित पुलाचे स्ट्रक्चरल ऑडीट केलेले व अश्या प्रकारच्या कामांचा अनुभव असणारे व मनपाचे सल्लागार पॅनेलवर असणारे मे.सी.व्ही.कांड कन्स्लटंट प्रा.लि. यांची प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणुन नेमणुक करणे आवश्यक आहे. याकामी त्यानी दि.३१/०७/२०१९ च्या पत्रान्वये सल्लागार म्हणून काम करण्यास तयारी दर्शवलेली आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | प्रकल्प सल्लागाराचे नाव | फी |
|---|---|---|---|
| १ | पिंपरी, इंदिरा गांधी रेल्वे उड्डाणपुलाचे स्ट्रक्चरल ऑडीट करणे व दुरुस्ती करणे. | मे.सी.व्ही.कांड कन्स्लटंट प्रा.लि. | २.००% |

मनपाच्या मान्य प्रस्तावानुसार व शासन निर्णयानुसार खालील तक्त्यानुसार प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांना फी अदा करावी लागणार आहे.

| अ.क्र. | प्रकल्पाच्या/कामाच्या प्रगतीचा टप्पा | नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेने प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार शुल्काचे प्रदानाचे प्रमाण (प्रकल्प किंमतीच्या प्रमाणात) | |
|---|---|---|---|
| | | महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियानांतर्गत प्रकल्पासाठी | इतर सर्व कामांसाठी |
| १ | प्रकल्पाचे प्रशासकीय मान्यतेचे आदेश निर्गमित झाल्यानंतर | ०७५% (डीपीआर ०.५०%+ प्र.मा.-०.२५%) | ०.५० (डीपीआर ०.३३% +प्रमा-०.१७%) |
| २ | प्रकल्पातील कामाचे कार्यादेश दिल्यानंतर | ०.२५% | ०.१६ |
| ३ | प्रकल्पाचे २५ टक्के काम पुर्ण झाल्यानंतर | ०.४०% | ०.२७ |
| ४ | प्रकल्पाचे ५० टक्के काम पुर्ण झाल्यानंतर | ०.४०% | ०.२७ |
| ५ | प्रकल्पाचे ७५ टक्के काम पुर्ण झाल्यानंतर | ०.६०% | ०.४० |
| ६ | प्रकल्पाचे १०० टक्के काम पुर्ण झाल्यानंतर | ०.६०% | ०.३० |
| ७ | सेवाहमी कालावधीकरीता | - | ०.१० |
| **एकुण** | | ३.००% | २.००% |

उपरोक्त नमुद केल्यानुसार प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणुन मे.सी.व्ही.कांड कन्स्लटंट प्रा.लि. यांची नेमणुक करणेस व शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१८/प्र.क.५४/नवि-१६, मंत्रालय, मुंबई-४०००३२ दि.०४/०६/२०१८ व मनपाकडील मान्य प्रस्तावान्वये २.००%+०.५०%( स्ट्रक्चरल डिझाईन तपासणी फी) अशी एकुण २.५०% फी अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक - ५१२९ विषय क्रमांक – २४
दिनांक – ३१/०७/२०१९ विभाग – स्थापत्य मुख्यालय
सूचक – मा.राजेंद्र लांडगे अनुमोदक – मा.नम्रता लोंढे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे कडील पत्र क्र.स्था/नि/EWS/२४५/२०१९ दि.१६/०७/२०१९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.53/01/2018-2019 अन्वये शहर झोपडपट्टी पुनर्वसन अंतर्गत अजंठानगर विठ्ठलनगर येथील प्रकल्पामधील इमारतींची लिफ्ट खरेदी करणे व (AMC) करणेकामी मे.श्रीकृपा एंटरप्रायजेस नि.र.रू.50,84,745/- (अक्षरी र.रु.पन्नास लाख चौ-याऐंशी हजार सातशे पंचेचाळीस फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.50,84,745/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.50,84,745/- पेक्षा 0.00% कमी म्हणजेच र.रु.50,84,745/- + रॉयल्टी चार्जेस र.रु.0/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.0/- = एकुण र.रु.50,84,745/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक - ५१३० विषय क्रमांक – २५
दिनांक – ३१/०७/२०१९ विभाग – ह क्षेत्रीय, स्थापत्य
सूचक – मा.सागर आंगोळकर अनुमोदक – मा.झामाबाई बारणे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे कडील पत्र क्र.हक्षे/स्था/कावि/४१९/२०१९ दि.२४/०७/२०१९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

सन २०१९-२० चे अंदाजपत्रकात भांडवली या लेखाशिर्षाखाली प्रस्तावात नमूद कामांसाठी अंतिम देयक अदा करण्यासाठी सन २०१९-२० चे सुधारित अंदाजपत्रक मंजूर होईपर्यंत एकुण र.रू.४३,५०,०००/- (अक्षरी र.रू.त्रेचाळीस लाख पन्नास हजार फक्त) तरतूद वाढ करणे आवश्यक आहे. सन २०१९-२० चे अंदाजपत्रकातील संबंधित लेखाशिर्षामध्ये वाढ/ घट करुन अंतर्गत वर्गीकरण करणेस

मान्यता देणेत येत आहे. (वाढ/घट र.रू.४३,५०,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक - ५१३१ विषय क्रमांक – २६

दिनांक – ३१/०७/२०१९ विभाग – ह क्षेत्रीय, स्थापत्य

सूचक – मा.राजेंद्र गावडे अनुमोदक – मा.आरती चोंधे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे कडील पत्र क्र.हक्षे/स्था/कावि/४२०/१९ दि.२४/०७/२०१९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

सन २०१९-२० चे अंदाजपत्रकात महसुली या लेखाशिर्षाखाली प्रस्तावात नमूद कामांसाठी अंतिम देयक अदा करण्यासाठी सन २०१९-२० चे सुधारित अंदाजपत्रक मंजूर होईपर्यंत एकुण र.रू.१८,००,०००/- (अक्षरी र.रू.अठरा लाख फक्त) तरतूद वाढ करणे आवश्यक आहे. सन २०१९-२० चे अंदाजपत्रकातील संबंधित लेखाशिर्षामध्ये वाढ/ घट करुन अंतर्गत वर्गीकरण करणेस मान्यता देणेत येत आहे. (वाढ/घट र.रू.१०,००,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले

**(मडिगेरी विलास हनुमंतराव)**
**सभापती**
स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८ नगरसचिव विभाग,
क्रमांक - नस/३/कावि/८२८/२०१९
दिनांक – ०१/०८/२०१९



**(उल्हास बबनराव जगताप)**
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत - सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडेपुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना

**(क्र.इक्षे/स्था/कावि/५६३/२०१९ दि.२०/०७/२०१९ विषय क्र.७ चे लगत)**

प्रपत्र अ

विषयः- सन २०१९-२० च्या अर्थसंकल्पातील इ क्षेत्रीय - स्थापत्य कार्यालयातील कामांच्या तरतुदी मध्ये वाढ / घट करणे बाबत...

प्रभाग क्र. ७ मधील विकास कामांनां खालील प्रमाणे वाढ / घट करणे आवश्यक आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सन २०१९-२०चे अंदाजपत्रकामधील खालील नमुद केल्याप्रमाणे तरतुद वाढ / घट करणेस मा. स्थायी समितीची मान्यता मिळावी ही विनंती.

| अ.क्र. | कामाचे नाव | पान क्र. | अ.क्र. | लेखाशिर्ष | कामाची अंदाजपत्रकीय रक्कम | सन २०१९-२० ची मुळ तरतूद | वाढ करावयाची तरतूद | घट करावयाची तरतूद | सन २०१९-२० साठी एकुण सुधारीत तरतूद |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | प्रभाग क्र. ७ मधील नाल्याची उंची वाढविणे व अनुषंगीक कामे करणे. | १७३ | ३ | भांडवली अ | ५००००००० | १००० | २५०००००० | ० | २५०१००० |
| २ | स.नं.१ मधील खेळाच्या मैदानासाठी प्रेक्षक गॅलरी उभारणे | २२ | ९० | विशेष योजना | १५००००००० | १५०००००० | ० | २५०००००० | १२५०००००० |
| | एकुण | | | | २००००००००० | १५००१००० | २५०००००० | २५०००००० | १५००१००० |

~~संजय घुवे~~
संजय घुवे
कार्यकारी अभियंता
इ क्षेत्रिय कार्यालय
पिं.चिं.म न पा भोसरी -३९

अतिरिक्त आयुक्त
पिंपरी-चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-४११ ०१८

(८०)

**(क्र.हक्षेका/लेखा/कावि/२०/२०१९ दि.२३/०७/२०१९ विषय क्र.१४ चे लगत)**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, ह क्षेत्रीय कार्यालय, कासारवाडी -34

(विषयपत्र क्र.हक्षेका/लेखा/कावि/ 115 /2019 दि.20 /02 /2019 लगत)

प्रपत्र " अ "

| अ.क्र. | ठेकेदाराचे नाव | निविदा क्रमांक | कामाचे नाव | करारनामा केलेची तारीख | कामाचा आदेश क्रमांक | कामाचा आदेश दिनांक | निविदा रक्कम | स्विकृत दर | निविदा खर्चाची मान्यतेची रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1) | मे.फेलोशिप ग्रुप | स्थापत्य/ह प्रभाग/ Prabhag/ 4-1/2018-2019 | प्रभाग क्र.30 दापोडी भागात बेंचेस पुरविणे व बोर्ड बसविणे | 01/03/2019 | हक्षेका/लेखा/कावि/131 /2019 | 05/03/2019 | 598100/- | -20.23% | 477104/- |
| 2) | मे.प्रकाश कॉन्ट्रक्टर | स्थापत्य/ह प्रभाग/ Prabhag/ 4-2/2018-2019 | प्रभाग क्र.30 कासारवाडी भागात बेंचेस पुरविणे व बोर्ड बसविणे. | 01/03/2019 | हक्षेका/लेखा/कावि/134 /2019 | 05/03/2019 | 597528/- | -9.99% | 537835/- |
| 3) | मे.प्रकाश कॉन्ट्रॅक्टर | स्थापत्य/ह प्रभाग/ Prabhag/ 4-3/2018-2019 | प्रभाग क्र.30 फुगेवाडी भागात बेंचेस पुरविणे व बोर्ड बसविणे | 01/03/2019 | हक्षेका/लेखा/कावि/133 /2019 | 05/03/2019 | 599417/- | -9.99% | 539535/- |
| 4) | मे.एस.एस. एंटरप्रायझेस | स्थापत्य/ह प्रभाग/ Prabhag/ 4-4/2018-2019 | सन 2018-19 साठी प्रभाग क्र.30 मध्ये स्टॉर्म वॉटर लाईन साफसफाईची, राडारोडा उचलणे व आरोग्यविषयक कामे करणे | 01/03/2019 | हक्षेका/लेखा/कावि/135/2019 | 05/03/2019 | 837519/- | -20% | 670015/- |

कार्यकारी अभियंता (स्थापत्य)
ह क्षेत्रीय कार्यालय
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
कासारवाडी, 34.

c:\Users\admin\Desktop\स्थायी समिति विषय अवलोकनार्थ.docx 2

# प्रपत्र अ

(क्र.माजसं/२/कावि/३१९/२०१९ दि.२६/०७/२०१९ विषय क्र.२२ चे लगत)

१४३१४

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
माहिती व जनसंपर्क विभाग
माजसं/२/कावि/३१९/२०१९
दि. २६/०७/२०१९

प्रति,
नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-१८

**विषय- जाहिरात रोटेशन धोरण सन २०१९-२० बाबत**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने शासन मान्य यादीवर असणा-या वृत्तपत्रांना शासनमान्य दराने जाहिराती देणेत येतात. यामध्ये अ, ब, व क वर्ग वृत्तपत्रांचा समावेश आहे. शासनमान्य दराने जाहिरात प्रसिध्द करणाऱ्या खालील वृत्तपत्रांना मनपाच्या यादीवर घेण्यास व शासनमान्य दराने जाहिराती वितरीत करण्यास मान्यता असावी.

रोटेशन (अ) - एका कामाची निविदा २ कोटी पर्यंत असल्यास-

| अ.क्र. | वृत्तपत्राचे नाव | दर प्रति चौ.सें.मी. |
|---|---|---|
| १ | दै.पुढारी | १२८/- |
| | दै.पुणे जिल्हा सांज समाचार | २८/- |
| | दै.कातिब | १७/- |
| | सा.पिंपरी चिंचवड पवनेचा प्रवाह | ६/- |
| | सा.काय चाललंय | ६/- |
| | | |
| २ | दै.लोकमत | ९०/- |
| | दै.लोकमंथन | १६/- |
| | दै.सिध्दांत समाचार | १६/- |
| | सा.पुरोगामी विचारांची झुंज | ५/- |
| | | |
| ३ | दै.पुण्यनगरी | ५६/- |
| | दै.बहुजनरत्न लोकनायक | ३४/- |
| | दै.विश्वदर्पण | १६/- |
| | सा.माझी सखी सोबती | ६/- |
| | सा.जनप्रेम | ६/- |
| ४ | दै.लाईफ ३६५ | ५०/- |
| | दै.संध्या | ३५/- |
| | दै.सांज महानगरी | ३३/- |
| | दै.पवना समाचार | २७/- |
| | सा.प्रगत भारत | ७/- |
| | | |

| | | |
|---|---|---|
| ५ | दै.नवभारत | ५०/- |
| | दै.नवराष्ट्र | ४३/- |
| | दै.लोकमान्य सांजवार्ता | ३३/- |
| | दै.लोकटाईम्स | २०/- |
| | सा.कात्रजच्या बोगदयातून | १९/- |
| | | |
| ६ | दै.सामना | ६८/- |
| | दै.बिझनेस स्टॅंडर्ड | २३/- |
| | दै.महाराष्ट्र निरोप्या | १६/- |
| | दै.जनमंथन | १६/- |
| | सा.क्रांतीप्रकाश | ६/- |
| | | |
| ७ | दै.आज का आनंद | ५२/- |
| | दै.दिवस रात्री | १९/- |
| | दै.पिंपरी चिंचवड समाचार | १८/- |
| | दै.विश्वेश्वर | १६/- |
| | सा.सहारा | ९/- |
| | | |
| ८ | दै.लोकसत्ता | ६१/- |
| | दै.केसरी | ५०/- |
| | दै.बंधुप्रेम | १७/- |
| | दै.दायित्व | १६/- |
| | सा.पुष्पप्रकाश | ७/- |
| ९ | दै.सकाळ | १८०/- |
| | दै.संध्यानंद | ७२/- |
| | दै.राष्ट्रतेज | २६/- |
| | दै.नवीन संध्या | १६/- |
| | सा.नव्या समाजाची चाहुल | ७/- |
| | | |
| १० | दै.महाराष्ट्र टाईम्स | १३२/- |
| | दै.प्रभात | ४३/- |
| | दै.भारत डायरी | १६/- |
| | सा.बृहन वार्ता | ७/- |
| | सा.समाज गर्जना | ६/- |

**रोटेशन (ब) -** एका कामाची निविदा २ कोटी पुढील ते ७ कोटी पर्यंत असल्यास तसेच महापालिकेची नोकर भरती, मानधनावरील नियुक्ती इ. च्या जाहिराती खालील वृत्तपत्रांस राज्यस्तरावर देण्यात याव्यात.

विविध विभागातील योजना, औद्योगिक प्रशिक्षण केंद्राकडील प्रवेश प्रक्रिया, विविध कोर्सेस तसेच नगररचना विभागाकडील सर्व जाहिराती, जाहीर नोटीस इत्यादी विषयक जाहिराती शासनमान्य दराने स्थानिकस्तरावर वृत्तपत्रास देणेत यावी.

१) दै. सकाळ x दै.आज का आनंद

२) दै.महाराष्ट्र टाईम्स x दै.पुण्यनगरी x दै.प्रभात
३) दै.पुढारी x दै.लोकसत्ता x दै. नवभारत
४) दै.लोकमत x दै.सामना x दै.केसरी

रोटेशन (क) – मा. महापालिका सभेची नोटीस स्थानिक वर्तमानपत्र दै. पवना समाचार मध्ये प्रसिध्द करणेत यावी.

रोटेशन (ड) – एकाच कामाची निविदा र.रु. ७ कोटीच्या पुढे असल्यास सदर जाहिरात राज्यस्तर व देशस्तरावर खालील वृत्तपत्रात करारनामा न करता आकारमान निश्चित करुन जाहिराती देवून जाहिरातींचे बिल त्यांच्या सवलतीच्या दरानुसार देण्यात यावे.

१. दै. पुढारी X दै. जागरण
२. दै. सकाळ X दै. भास्कर
३. दै. पुण्यनगरी X दै. हिंदुस्तान X दै. हिंदुस्तान टाईम्स
४. दै. महाराष्ट्र टाईम्स X दै. नवभारत टाईम्स X दै.टाईम्स ऑफ इंडिया X दै. नवभारत
५. दै.लोकसत्ता X दै.इंडियन एक्सप्रेस X दै.न्यू इंडियन एक्स्प्रेस
६. दै. लोकमत X दि हिंदू + बिझनेस लाईन X दै. बिझनेस स्टॅंडर्ड

| अ.क्र. | वृत्तपत्राचे नांव | पुणे आवृत्ती दर प्रती चौ.सेमी | | राज्यस्तर (महाराष्ट्र) दर प्रती चौ.सेमी. ०१/०४/२०१९ पासून लागू | देशस्तर (भारत) दर प्रती चौ.सेमी ०१/०४/२०१९ पासून लागू |
|---|---|---|---|---|---|
| | | शासकीय ०१/०१/१९ पासून लागू | सवलतीचे ०१/०४/१९ पासून लागू | | |
| १ | दै.लोकसत्ता | ६१/- | - | १९५०/- | - |
| २ | दै.इंडियन एक्सप्रेस | - | ५५०/- | १८५०/- | २५५०/- |
| ३ | दै.लोकसत्ता + दै.इंडियन एक्सप्रेस | - | ६११/- | २७००/- | ३१००/- |
| ४ | दै.महाराष्ट्र टाईम्स | १३२/- | - | १४९३/- | - |
| ५ | दै. टाईम्स ऑफ इंडिया + पुणे मिरर (सर्व आवृत्तींकरिता) | | ६५७/- | २९९५/- | ५३३६/- |
| ६ | दै.महाराष्ट्र टाईम्स + दै. टाईम्स ऑफ इंडिया + नवभारत टाईम्स + पुणे मिरर (सर्व आवृत्तींकरिता) | | ७८९/- | ३६५१/- | ६२२८/- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ७ | दै. बिझनेस स्टँडर्ड | २३/- | - | ५७५/- | १५६५/- |
| ८ | दै. हिंदुस्तान टाईम्स + दै.मिंट | | ४००/- | १९००/- | ४६००/- |
| १० | दै. हिंदुस्तान टाईम्स+ दै. हिंदुस्तान + दै.मिंट | - | - | - | ७,८००/- |
| १० | दै. दि हिंदू + बिझनेस लाईन | - | - | ४००/- | ४१००/- |
| ११ | दै. लोकमत | ९०/- | - | ३०००/- | --- |
| १२ | दै. सकाळ | १८०/- | - | २१००/- | --- |
| १३ | दै. पुढारी | १२८/- | - | १९००/- | --- |
| १४ | दै. पुण्यनगरी | ५६/- | - | १४००/- | --- |
| १५ | दै.दि न्यू इंडियन एक्स्प्रेस + द मोर्निंग स्टँडर्ड | - | - | - | २५००/- |
| १६ | दै.जागरण | - | - | - | ९५००/- |
| १७ | दै.आज का आनंद | ५२/- | - | ३००/- | - |
| १८ | दै. भास्कर | - | - | - | ९३००/- |
| १९ | दै. नवभारत | ५०/- | - | १०००/- | - |

उपरोक्त जाहिरात रोटेशन ठरविण्याचे अधिकार मा. आयुक्त यांना देण्यास तसेच

१ सन २०१९-२० साठी रोटेशन पध्दतीने वृत्तपत्रांना जाहिरात देण्यास

२. एखादी अतिमहत्त्वाची जाहिरात रोटेशन क्रम तोडून मा. आयुक्त , मा. अतिरिक्त आयुक्त यांनी मान्यता दिलेल्या वृत्तपत्रात प्रसिध्दीस देणेस

३. मनपाच्या विविध खात्यांच्या जाहिराती शासनाच्या राजपत्रात प्रसिध्दीस देणे. व त्यासाठी त्यांच्या दराने बील अदा करणेस

४. मागील वर्षाची थकित बीले सन २०१९-२० मध्ये अदा करण्यास

५. जाहिरात प्रसिध्दी करण्याबाबत मनपाचे जाहिरात रोटेशन धोरण मान्य असलेल्या मनपा रोटेशन यादीवरील नव्याने समाविष्ट केलेल्या वृत्तपत्रांकडून करारनामे करुन घेणेकामी मान्यता देण्यास

६ माहिती व जनसंपर्क विभागाकडून प्राप्त झालेल्या रोटेशन नुसार ज्या वृत्तपत्रांनी कमीत कमी आकारमानात जाहिरात प्रसिध्द केली असेल त्या वृत्तपत्राच्या आकारमानानुसार इतर वृत्तपत्रांना बिल अदा करण्यास किंवा विभागाने दिलेल्या आकारमानात जाहिरात प्रसिध्दी केली असेल त्या वृत्तपत्रांना बिल अदा करणेस

७. सदरच्या रोटेशन धोरणाची अंमलबजावणी पुढील वर्षाचे रोटेशन धोरण निश्चित होईपर्यंत सुरु ठेवण्यास

८. नव्याने जाहिराती देणे / मान्य धोरणात काही अडचणी निर्माण झाल्यास अगर फेरबदल करणे असल्यास याबाबत संपुर्ण निर्णय घेण्याचा अधिकार मा. आयुक्त यांना देण्याबाबत सदरचा विषय नजीकच्या मा. स्थायी समिती सभेसमोर निर्णयार्थ ठेवण्यात यावा.

आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – १८